# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलमं बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** कळंब

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0293 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/07/2024 00:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 19/07/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/07/2024
   **Time From (वेळेपासून):** 13:23 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/07/2024 **Time (वेळ):** 23:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 050

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/07/2024 23:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कळंब,कळंब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विनोद रामेश्वर हरभरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उपळाई,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उपळाई,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881894355

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामचंद्र किसन बहुरे | | | 1. पोलीस ठाणे कळंब, कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | महादेव तात्याभाऊ मुंडे | | | 1. पोलीस ठाणे कळंब,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ दराच्या 10 चलनी नोटा | 5,000.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 19.07.2024

मी विनोद रामेश्वर हरभरे, वय 35 वर्षे, व्यवसाय हॅाटेल व शेती रा. उपळाई ता. कळंब जि. धाराशिव मो.नं. 9881894355.

आज दिनांक 19.07.2024 रोजी मी कळंब येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन तक्रार दिली. त्यामधील थोडक्यात हकिगत अशी की, " काही दिवसापुर्वी रात्री 05 शेळ्याचे पिल्ले, त्यामध्ये 02 लहान बकरे व 03 लहान शेळी असे मला माझे हॅाटेल समोर रोडवर आढळुन आले. सदर शेळयाचे मालकाबाबत मी आजूबाजुचे शेतक-याकडे तसेच इतर लोकांकडे चौकशी केली. परंतु सदर शेळयांचा मालक मिळुन आला नाही. म्हणुन मी सदर शेळयाना हॅाटेलचे बाजुस असलेल्या शेतातील गोठयामध्ये ठेवले. सदर शेळया व बकरे खातपित नव्हते व त्या शेळयामधील 01 बकरे मरण पावले. त्यामुळे इतर शेळया व बकरे हे देखील मरतील म्हणुन दिनांक 15.07.2024 रोजी सोमवार आठवडी बाजार असल्याने सकाळी 08.00 वाजता मी व माझे मित्र 1) नागेश तुकाराम ओव्हाळ, 2) विनोद बाबासाहेब चव्हाण, 3) अजय शिवाजी मुंडे असे सदर चार शेळयाचे पिल्ले यांचा कोणी मालक मिळुन येतो का? याबाबत चौकशी करण्यासाठी कळंबच्या बाजारात आणले होते. आम्ही कळंब येथील बाजारात शेळयाचे पिल्ले घेवुन थांबलो असता तेथे आमचे जवळ कळंब पोलीस स्टेशन येथील PSI बहुरे साहेब व त्यांचेसोबत पोलीस शिंदे हे आले. त्यांनी मला व माझे सोबतचे वरील तीन मित्रांना शेळयाचे पिल्लांसह पोलीस स्टेशन कळंब येथे आणले. त्यानंतर पोलीस स्टेशन मध्ये त्यांनी आमच्याकडे सदर शेळया व बकरे तुमच्याकडे कुठून आल्या याबाबत चौकशी केली असता मी सदरच्या शेळया व बकरे हे मला काही दिवसापुर्वी माझे हॅाटेल समोर बेवारस मिळुन आल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने बहुरे साहेब हे एका अनोळखी इसमास आमचे समोर घेवुन आले व सदर व्यक्तीचे नाव आसिफ कुरेशी असे असुन ते सदर शेळयाचे मालक असल्याचे आम्हाला सांगितले. त्यानंतर मला व माझे तीन मित्रांना PSI बहुरे साहेब यांनी तुमच्यावर चोरीचा गुन्हा दाखल न करता किरकोळ कारवाई करुन तुम्हाला मदत करतो असे सांगुन त्यांनी माझेकडे 1,60,000/- रुपयेची मागणी केली. जर मी ते पैसे त्यांना दिले नाहीत तर ते माझ्यावर चोरीचा गुन्हा दाखल करतील म्हणुन मी नाईलाजास्तव माझे भाऊ व वडिल यांना बोलावून घेवून त्यादिवशी पैशाची जुळवा जुळव करून 1,55,000/- रुपये PSI बहुरे साहेब यांना दिले. त्यावेळी PSI बहुरे साहेब यांनी मला आनखिन तुझ्याकडे 5,000/- रुपये राहिलेले आहेत ते दोन-तीन दिवसात आणुन दे असे सांगुन त्यांनी आम्हाला सोडुन दिले " वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब यांचेकडे दिली होती.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने PSI बहुरे साहेब, पोलीस ठाणे कळंब यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे ? याबाबत त्यांची पंचासमक्ष पोलीस ठाणे कळंब येथे लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान त्यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन आकाश ज्योतीराम झुंजारे, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.धाराशिव यांची पंच क्रमांक 1 म्हणुन तर उत्तेश्वर भानुदास माळी, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.धाराशिव यांची पंच क्रमांक 2 म्हणुन नेमणुक केली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॅार्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोहेकॉ/जाधव यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोहेकॉ/जाधव यांनी सोबत आणलेल्या एका काळ्या रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॅार्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॅार्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॅार्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॅार्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच PSI बहुरे साहेब, पोलीस ठाणे कळंब यांचेत होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॅार्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॅार्ड होणार असलेबाबत सांगितले.



Scanned with CamScanner

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला PSI बहुरे साहेब, पोलीस ठाणे कळंब यांची भेट कोठे होईल ? याबाबत विचारले असता मी त्यांना PSI बहुरे साहेब, पोलीस ठाणे कळंब यांची भेट त्यांचे पोलीस स्टेशन कळंब येथेच होईल असे सांगीतले. तेंव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी PSI बहुरे साहेब, पोलीस ठाणे कळंब यांची पोलीस स्टेशन कळंब येथे पंचासह जावून त्यांची भेट घेवुन त्यांना तुमचे कामाबाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी पोहेकॉ/जाधव यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे अंगावरील शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन मला व पंच क्रं.1 झुंजारे यांना माझी इनोव्हा क्रिस्टा MH 25 BA 9699 या वाहनाने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन PSI बहुरे साहेब, यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे कळंब येथे 11.34 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच झुंजारे असे इनोव्हा क्रिस्टा MH 25 BA 9699 या वाहनाने पोलीस ठाणे कळंब येथे PSI बहुरे साहेब यांची भेट घेण्यासाठी आलो व त्यांना माझ्या मोबाईल वरुन स्पीकर ऑन करुन PSI बहुरे साहेब यांचे मोबाईलवर कॉल करुन त्यांना कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी आलो तुम्ही थांबा असे म्हणाले. त्यानंतर लगेच पोलीस ठाणे कळंबचे आवारात PSI बहुरे साहेब यांची भेट झाली तेंव्हा त्यांचे सोबत मुंडे पोलीस हे होते. PSI बहुरे साहेब यांची भेट झाल्यानंतर त्यांचेत व माझेत शेळया/बकरे प्रकरणात मदत केल्याचे बोलणे झाले. त्यानंतर PSI बहुरे साहेब हे मला म्हणाले की, पोलीस मुंडे यांचेकडे हात करुन साहेबांशी बोला काय हाय ती असा बोलुन PSI बहुरे साहेब तेथुन निघुन गेले. त्यानंतर पोलीस मुंडे यांनी मला पोलीस स्टेशन आवारातील रुम मध्ये घेवुन जावुन 5,000/-रुपयाची मागणी करुन लागलीच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी व पंच झुंजारे असे त्यांचेपासुन निघुन तक्रारदार यांचे गाडीने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.30 वा. परत आलो.
त्यानंतर पोहेकॉ/जाधव यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली.
यावरुन PSI बहुरे साहेब यांनी मला चोरीचा गुन्हा दाखल न करता किरकोळ कारवाई करुन तुम्हाला मदत करतो या कामासाठी त्यांनी पोलीस मुंडे यांचे मार्फतीने 5,000/-रुपये लाचेची मागणी करुन पोलीस मुंडे यांनी सदरची लाच रक्कम कळंब येथील माऊ ली मेडीकल जवळ घेवुन येण्यास सांगुन लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.
त्यावरुन म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, पंचाशी व सापळा पथक यांचेशी विचारविनिमय करुन PSI बहुरे साहेब व पोलीस मुंडे यांचेविरुध्द आज रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, लाचेच्या नोटांना ऍ़न्थ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेसमोर खाजगी वाहनाचे शिटवर ठेवल्या. मग त्यांनी ऍ़न्थ्रासीन पावडर लावणे, ऍ़न्थ्रासीन पावडरचे उपयोग, गुणधर्म व ऍ़ल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन सपोफौ/शेख यांनी मी पोलीस मुंडे यांना देण्यासाठी आणलेल्या 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटांना ऍ़न्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची खाजगी वाहनाचे दरवाजे व काचा बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात ऍ़ल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी सपोफौ/शेख यांनी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी पोलीस मुंडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावरुन डावा हात फिरवण्याचा ईशारा मला नेमुन दिला.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली व त्यांनी माझे व पोलीस मुंडे यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला पोलीस मुंडे यांची भेट कोठे होईल? याबाबत विचारले असता मी त्यांना पोलीस मुंडे यांनी मला पैसे घेवुन कळंब येथील माऊ ली मेडीकल जवळ येण्यास सांगितले आहे. त्यामुळे त्यांची भेट माऊ ली मेडीकल, शिवाजी चौक, कळंब येथेच होईल असे सांगीतले.



Scanned with CamScanner

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला पीनने लावुन मी व पंच झुंजारे असे माझी इनोव्हा क्रिस्टा MH 25 BA 9699 या वाहनाने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणापासुन 13.16 वाजता रवाना झालो. आमचे पाठोपाठ म्हेत्रे साहेब व सापळा पथक असे खाजगी वाहनाने निघाले. मी व पंच झुंजारे असे शिवाजी चौकातील माऊली मेडीकल येथे गेलो. तेथे पोलीस मुंडे यांना माझ्या मोबाईल वरुन फोन करुन आल्याचे सांगितले असता त्यांनी मला माऊ ली मेडीकल दुकानाच्या आत बोलाविले व त्यांनी पैश्यासाठी ईशारा केल्यानंतर मी माझे अंगावरील पॅन्टच्या समोरील उजव्या खिशातील 5,000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असता त्यांनी सदरची लाच रक्कम डाव्या हाताने स्विकारुन मेडिकल दुकानांचे काऊंटरवर ठेवुन नंतर त्यांचे अंगावरील शासकीय गणवेशाच्या पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिली. तेव्हा मी मला नेमुन दिलेला इशारा केला ती वेळ साधारण 13.23 वाजण्याची होती. त्याचवेळी तेथे म्हेत्रे साहेब, पंच क्रमांक 2 माळी आणि सापळा पथकातील पोलीस अंमलदार हजर आले व त्यांनी पोलीस मुंडे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांच्या सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी माझ्याजवळील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन तोे बंद केला व म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे वरदळ असल्याने पोलीस स्टेशन कळंब येथे येण्यास सांगितले. त्यावरुन मी पोलीस स्टेशन कळंब येथे आल्यानंतर मला तेथे बोलावुन घेतले. त्यानंतर मुंडे पोलीस यांना PSI बहुरे साहेब यांचेबाबत चौकशी केली असता PSI बहुरे हे पोलीस स्टेशन कळंब येथे हजर असल्याने त्यांना पण ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस स्टेशन कळंब येथील एका रुम मधील दरवाजा व खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधार करुन कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व अंगावरील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशाची अल्ट्राव्हायलेट लॅम्पव्दारे तपासणी केली असता माझे उजवे हाताचे बोटाचे पेऱ्यावर व पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशावर व आतील बाजुस ठिकठिकाणी ऍन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी आम्हा सर्वासमक्ष PSI बहुरे यांना त्यांचे संपुर्ण नावाबाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव 1) रामचंद्र किसन बहुरे, वय 31 वर्षे, परि पोउपनि, नेमणुक पोलीस ठाणे कळंब रा.बेमळयाचीवाडी ता. जि.छत्रपती संभाजीगनर सध्या चव्हाण पार्क, लक्ष्मी कॉलनी, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर ह.मु.दत्तनगर, कळंब व पोलीस मुंडे यांना त्यांचे संपुर्ण नावाबात विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव 2) महादेव तात्याभाऊ मुंडे वय 37 वर्षे, नेमणुक पोलीस ठाणे कळंब मुळ रा.भोगलवाडी ता.धारूर जि.बीड, ह.मु.दत्त नगर, कळंब असे असल्याचे सांगितले.

म्हेत्रे साहेब यांनी दोन्ही पंचा समक्ष मला पोलीस मुंडे यांना पैसे देण्यासाठी रवाना केले पासुन ते ईशारा करेपर्यंत घटनाक्रम सांगावा अशी विचारणा केली असता, मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर म्हेत्रे साहेब व पंचानी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले.

एकंदरीत दिनांक 15.07.2024 रोजी रामचंद्र किसन बहुरे, परि पोउपनि, नेमणुक पोलीस ठाणे कळंब यांनी आमच्यावर चोरीचा गुन्हा दाखल न करता किरकोळ कारवाई करुन मदत करतो असे म्हणुन माझ्याकडे 1,60,000 /-रुपयेची मागणी केली व त्यापैकी 1,55,000/- रुपये त्याच दिवशी त्यांनी घेवुन राहिलेले 5,000/- रुपये आज दिनांक 19.07.2024 रोजी रामचंद्र किसन बहुरे, परि पोउपनि, नेमणुक पोलीस ठाणे कळंब यांनी महादेव तात्याभाऊ मुंडे, पोहेकॉ/1006 यांचे मार्फतीने 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन प्रोत्साहन दिले तसेच महादेव तात्याभाऊ मुंडे पोहेकॉ/1006, नेमणुक पोलीस ठाणे कळंब यांनी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच 5,000/- रुपये स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले आहे. त्यामुळे 1) रामचंद्र किसन बहुरे, वय 31 वर्षे, परि पोउपनि, नेमणुक पोलीस ठाणे कळंब, 2) महादेव तात्याभाऊ मुंडे पोहेकॉ/1006 नेमणुक पोलीस ठाणे कळंब यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद लॅपटॉपवर टंकलिखीत करुन त्याची प्रिन्ट काढुन मला वाचण्यास दिली ती मी वाचुन पाहिली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVI SHRIHARI SANAP(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, कळंब
जि.धाराशिव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVI SHRIHARI SAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with CamScanner